**प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाच्या तरतुदीमध्ये सुधारणा/बदल करणे व विशेष प्रकल्पांचा समावेश करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०१८/प्र.क्र.१/अभियान-१**
२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ३० मे, २०१९.

**वाचा** : १) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.१९५/रोस्वरो-१, दिनांक ०३/०८/२०१५.
२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.१२२/रोस्वरो-१, दिनांक ०२/०९/२०१५.
३) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.१९५/रोस्वरो-१, दिनांक ११/०१/२०१६.
४) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.५८/अभियान-१, दिनांक ११/०१/२०१६.
५) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.१२२/अभियान-१, दिनांक १२/०१/२०१७.
६) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.५६/अभियान-१, दिनांक १६/०३/२०१७.
७) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.२३७/अभियान-१, दिनांक २६/१२/२०१७.

**प्रस्तावना :**

राज्यातील १५ ते ४५ या कार्यप्रवण वयोगटातील युवक-युवतींचे कौशल्य विकास (Skill Development), कौशल्य वर्धन (Up-Skilling) व पुनर्कोशल्य (Re-Skilling) द्वारे सक्षमीकरण करुन त्यांना अधिक मागणी असलेल्या उद्योग, सेवा व तत्सम क्षेत्रात रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये "प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान" राबविण्यात येते. सदर अभियान हे सर्वसमावेशक असून त्याचे स्वरुप बहुआयामी आहे. सदर अभियानामध्ये शालेय शिक्षणात व्यवसाय शिक्षणात समावेश करणे, प्रताडीत/अत्याचारग्रस्त महिला/ मुलींना कौशल्य प्रशिक्षणासाठी प्राधान्य देणे तसेच दिव्यांग हक्क कायदा, २०१६ च्या अनुषंगाने सुधारणा/बदल करण्याची तसेच विशेष प्रकल्पांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :

राज्यातील नवनवीन प्रकल्पांतर्गत उपलब्ध असलेल्या पायाभूत/प्रशिक्षण सुविधांचा वापर कौशल्य व उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता करुन त्याद्वारे राज्यातील जास्तीत-जास्त युवक-युवतींना

कौशल्ययुक्त करुन त्यांना रोजगार/स्वयंरोजगाराच्या जास्तीत-जास्त संधी उपलब्ध करुन देण्याकरिता प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत खालील ०३ "विशेष प्रकल्प" राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) **<u>यंत्रसामुग्री/साधनसामुग्री खरेदीकरिता सहाय्य</u>** – सदर विशेष प्रकल्पांतर्गत ज्या औद्योगिक संघटना (Industrial Association)/कॉर्पोरेट उद्योग त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या पायाभूत/प्रशिक्षण सुविधांचा वापर करुन मोठ्या प्रमाणात कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबवू इच्छितात अशा औद्योगिक संघटना (Industrial Association)/कॉर्पोरेट उद्योगांना प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता आवश्यक यंत्रसामुग्री/साधनसामुग्री खरेदीकरिता खालील पद्धतीने आर्थिक सहाय्य करण्यात येईल.

i) औद्योगिक संघटना (Industrial Association)/कॉर्पोरेट उद्योग किमान ३ वर्षे कालावधीपासून कार्यरत असणे आवश्यक राहील.

ii) औद्योगिक संघटना विभागीय अथवा राज्य स्तरावरील असावी तसेच सक्रीय युनिटची संख्या किमान ५० असणे आवश्यक राहील.

iii) प्रशिक्षण कार्यक्रम किमान ५ वर्षे कालावधीकरिता राहील तसेच सदर प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत कौशल्य प्रशिक्षणाचे किमान लक्ष्य १०,००० उमेदवार इतके असणे आवश्यक राहील.

iv) प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत प्रति उमेदवार अनुज्ञेय असलेल्या प्रशिक्षण खर्चाच्या ७०% च्या मर्यादेतच प्रकल्प खर्च अनुज्ञेय राहील.

v) प्रकल्पाचा एकूण खर्च रुपये ५०.०० कोटी पेक्षा कमी नसेल.

vi) प्रशिक्षण कार्यक्रमासाठी मानकानुसार आवश्यक असलेली यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या ३०% मर्यादेत आर्थिक सहाय्य करण्यात येईल. सहाय्य केल्यानंतर ६ महिने कालावधीच्या आत प्रत्यक्ष प्रशिक्षणास सुरुवात करणे बंधकारक राहील.

vii) प्रकल्प खर्चाची उर्वरित रक्कम संबंधित औद्योगिक संघटना (Industrial Association)/ कॉर्पोरेट उद्योगांना खालीलप्रमाणे अदा करण्यात येईल.

| टप्पा क्रमांक | तपशिल | प्रकल्प खर्चाची रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षण तुकडी सुरु केल्यानंतर (७ दिवसांत) | २०% |
| २ | उमेदवारांच्या कौशल्याचे मुल्यांकन (Assessment) व प्रमाणन (Certification) झाल्यानंतर. | २०% |
| ३ | रोजगार उपलब्ध करुन दिलेल्या उमेदवारांच्या रोजगारास तीन महिने कालावधी झाल्याबाबतचे पुरावे सादर केल्यानंतर. | १०% |

viii) प्रकल्प खर्चाच्या २०% रक्कम औद्योगिक संघटना (Industrial Association)/कॉर्पोरेट उद्योग हे संबंधित प्रशिक्षणार्थ्यांकडून स्विकारु शकतील.

ix) प्रकल्प खर्चाच्या रक्कमेपैकी उपरोक्त (vi), (vii) व (viii) नुसार संबंधित औद्योगिक संघटना (Industrial Association)/कॉर्पोरेट उद्योगांना प्रकल्प खर्चाच्या ३०%, ५०% व २०% रक्कम प्राप्त होईल. तथापि, यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करिता प्रत्यक्ष खर्च ३०% पेक्षा कमी

झाल्यास, प्रकल्प खर्चाची ३०% रक्कम व यंत्रसामुग्री/साधनसामुग्री खरेदी करिता प्रत्यक्ष झालेला खर्च यामधील फरकाची रक्कम उपरोक्त (vii) मध्ये नमूद टप्पा क्रमांक ३ मधील १०% रक्कमेसमवेत अदा करण्यात येईल.

x) औद्योगिक संघटना (Industrial Association)/ कॉर्पोरेट उद्योगांसमवेत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचे स्तरावर सामंजस्य करार (MoU) करण्यात येईल.

xi) यंत्रसामुग्रीकरिता अनुज्ञेय असलेल्या आर्थिक सहाय्यातून यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीच्या पुरवठादारांची देयके परस्पर महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत अदा करण्यात येतील.

xii) प्रशिक्षण कार्यक्रमासाठी खरेदी करण्यात आलेली यंत्रसामुग्री व साधनसामुग्री सामंजस्य करारामध्ये नमूद केलेले प्रशिक्षणाचे लक्ष्य पुर्ण होईपर्यंत शासनाकडे तारण राहील.

xiii) सामजंस्य करारानुसार प्रशिक्षणाचे निर्धारीत लक्ष्य विहित वेळेत पुर्ण झाल्यावर यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीवरील शासनाचे तारण संपुष्टात येईल. तथापि, औद्योगिक संघटना (Industrial Association)/कॉर्पोरेट उद्योग यांनी सामंजस्य करारानुसार प्रशिक्षणाचे निर्धारीत लक्ष्य पुर्ण करण्यास असफल झाल्यास अथवा निर्धारीत लक्ष्य पूर्ण करण्यास अमर्थता दर्शविल्यास औद्योगिक संघटना (Industrial Association)/कॉर्पोरेट उद्योग यांची प्रशिक्षण कार्यक्रमाची इमारत/जागा त्यामधील यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीसह शासनाच्या ताब्यात घेण्यात येईल व प्रशिक्षणाचे निर्धारीत लक्ष्य अन्य औद्योगिक संघटना (Industrial Association)/कॉर्पोरेट उद्योगांद्वारे पूर्ण करण्यात येईल. प्रशिक्षणाचे निर्धारीत लक्ष्य पूर्ण झाल्यावर सदर इमारत/जागा पुनश्च: संबंधित औद्योगिक संघटना (Industrial Association)/कॉर्पोरेट उद्योग यांना हस्तांतरीत करण्यात येईल.

२) <u>Revolving Fund</u> - सदर विशेष प्रकल्पांतर्गत कोर्पोरेट क्षेत्रातील जे उद्योग त्यांची कुशल मनुष्यबळाची मागणी पूर्ण करण्याकरिता कौशल्य व उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यास व त्यायोगे निर्माण झालेल्या कुशल मनुष्यबळास रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यास इच्छूक असतील त्यांना खालीलप्रमाणे कौशल्य व उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबविता येईल.

i) सदर विशेष प्रकल्पांतर्गत कौशल्य व उद्योजकता प्रशिक्षण देण्यास इच्छूक असलेला कोर्पोरेट क्षेत्रातील उद्योग किमान १ वर्ष कालावधीपासून कार्यरत असणे आवश्यक राहील. तसेच सदर प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत कौशल्य प्रशिक्षणाचे किमान लक्ष्य १,००० उमेदवार इतके असणे आवश्यक राहील.

ii) सदर प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत प्रति उमेदवार अनुज्ञेय असलेल्या प्रशिक्षण खर्चाच्या ७०% च्या मर्यादेतच प्रकल्प खर्च अनुज्ञेय राहील.

iii) संबंधित उद्योगांसमवेत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचे स्तरावर सामंजस्य करार (MoU) करण्यात येईल व प्रकल्प खर्चाइतक्या रक्कमेचा निर्माण करण्यात येईल.

iv) सदर प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत संबंधित उद्योगांना प्रकल्प खर्चाची रक्कम Revolving Fund मधून खालीलप्रमाणे अदा करण्यात येईल.

| टप्पा क्रमांक | तपशिल | प्रकल्प खर्चाची रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षण तुकडी सुरु केल्यानंतर (७ दिवसांत) | ३०% |
| २ | उमेदवारांच्या कौशल्याचे मुल्यांकन (Assessment) व प्रमाणन (Certification) झाल्यानंतर . | ५०% |
| ३ | रोजगार उपलब्ध करुन दिलेल्या उमेदवारांच्या रोजगारास तीन महिने कालावधी झाल्याबाबतचे पुरावे सादर केल्यानंतर . | २०% |

v) कौशल्य व उद्योजकता प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन दिल्यानंतर प्रकल्प खर्चाची प्रति उमेदवार निश्चित होणारी रक्कम (व्याज विरहित) संबंधित उमेदवारास रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन दिल्यानंतर पुढील कॅलेंडर महिन्यापासून त्याचेकडून जास्तीत-जास्त १२ समान मासिक हप्त्यांमध्ये वसूल करुन ती वसूल केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आंत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या Revolving Fund मध्ये जमा करण्याची जबाबदारी ज्या उद्योगांसमवेत सामंजस्य करार करण्यात आला असेल त्या उद्योगाची राहील. तथापि, प्रशिक्षणाअंती यशस्वी ठरलेल्या उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन दिल्यानंतर एखादा उमेदवार काही अपरिहार्य कारणास्तव रोजगार/स्वयंरोजगार स्विकारु शकला नाही तर संबंधित उद्योगास उपरोक्त (iv) मधील टप्पा क्रमांक ३ ची २०% रक्कम अनुज्ञेय ठरणार नाही. तसेच सदर उमेदवाराकडून प्रकल्प खर्चाची प्रति उमेदवार निश्चित होणारी रक्कम वसूल करण्यात येणार नाही.

३) **केंद्र/राज्य शासनाच्या आस्थापनांना कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमांकरिता पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आर्थिक सहाय्य** - केंद्र शासन/राज्य शासनाच्या ज्या आस्थापना/संस्था राज्यातील शासकीय/ निमशासकीय आस्थापना, महामंडळे, स्वायत्त संस्था, Public Sector Undertaking यांच्या इमारतीमध्ये कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबवू इच्छितात अशा आस्थापना/संस्थांना सदर इमारतीमध्ये प्रशिक्षणाकरिता आवश्यक पायाभूत सुविधांकरिता जसे की, इमारतीचे नुतनीकरण/दुरुस्ती इत्यादी खालीलप्रमाणे आर्थिक सहाय्य करण्यात येईल.

i) संबंधित आस्थापना/संस्थेने कौशल्य व उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमासाठी निर्माण करावयाच्या पायाभूत सुविधांचा सविस्तर तपशिल, खर्चाचे अंदाजपत्रक, जागा/ इमारतीचा तपशिल, प्रशिक्षण कार्यक्रमाचा तपशिल इत्यादी बाबी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीस सादर करणे आवश्यक राहील.

ii) केंद्र/राज्य शासनाच्या आस्थापना/संस्थेस संबंधित विभागाने कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षणाकरिता दिर्घ कालावधीसाठी इमारत उपलब्ध करून दिलेली असणे आवश्यक राहील. राज्य शासनाच्या अखत्यारीतील इमारतींबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांनी इमारतींची उपलब्धता प्रमाणित करणे आवश्यक राहील.

iii) प्रशिक्षण कार्यक्रम किमान ५ वर्षे कालावधीकरिता राबविणे आवश्यक राहील. तसेच प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत कौशल्य प्रशिक्षणाचे निर्धारीत किमान लक्ष्य सादर करणे आवश्यक राहील.

iv) संबंधित आस्थापना/संस्थेसमवेत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचे स्तरावर सामंजस्य करार (MoU) करण्यात येईल.

v) पायाभूत सुविधा निर्माण केलेल्या इमारतीची मालकी संबंधित विभागाकडेच राहील.

vi) प्रशिक्षण कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्या इतर बाबी जसे की, यंत्रसामुग्री/ साधनसामुग्री इत्यादीची पूर्तता करण्याची जबाबदारी प्रशिक्षण कार्यक्रम राबविणाऱ्या आस्थापना/संस्थेची राहील.

२. राज्यामध्ये प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने अभियानाच्या कार्यपद्धतीमध्ये खालील सुधारणा/बदल करण्यात येत आहेत.

१) **प्रताडित/अत्याचारग्रस्त महिला/मुलींना कौशल्य व उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमात प्राधान्य** - समाजातील सर्व घटकांना कौशल्य प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्याकरीता राज्यातील ज्या प्रताडित/अत्याचारग्रस्त महिला/मुलींनी त्यांच्यावर झालेल्या अत्याचाराविरोधात महिला आयोगाकडे दाद मागितली असेल अथवा महिला आयोगाने स्वयंस्फूर्तीने त्याची दखल घेतली असेल, अशा महिला व मुलींना प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता अभियानांतर्गत कौशल्य व उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमात प्राधान्य देण्यात येईल.

२) **दिव्यांग हक्क कायदा, २०१६ ची अंमलबजावणी** - दिव्यांग हक्क कायदा, २०१६ च्या अनुषंगाने प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाकरिता उपलब्ध निधीच्या ५% निधी दिव्यांगांच्या कौशल्य व उद्योजकता विकास प्रशिक्षणाकरिता वापरण्यात येईल. सदर ५% निधीपैकी १% निधी दिव्यांगांना दैनंदिन जीवन सुलभतेने जगण्यासाठी आवश्यक असणारे कौशल्य प्रशिक्षण जसे की, अंध व्यक्तींना बेल लिपीच्या माध्यमातून व मुकबधीर व्यक्तींना सांकेतिक भाषेच्या माध्यमातून देण्याकरिता वापरण्यात येईल.

३) **शालेय शिक्षणात व्यवसाय शिक्षणाचा समावेश करणे** - शालेय स्तरावरील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना कौशल्य विषय घेण्यास प्रवृत्त करण्यासाठी प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानासंदर्भातील विभागाच्या दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ९.५ मध्ये शालेय शिक्षणात व्यवसाय शिक्षणाचा अंतर्भाव करण्याची बाब नमूद करण्यात आली आहे. राज्यातील सुमारे १५०० माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांना V१, V२, V३, व V४ हे व्यवसाय विषय शिकविण्यात येतात. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सदर विषयांची ३० गुणांची लेखी परीक्षा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत घेण्यात येणार असून महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेमार्फत (MSCVT) ७० गुणांची कौशल्य चाचणी घेण्यात येणार आहे. सदर कौशल्य चाचणीकरिता महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेने निश्चित केलेल्या शुल्कातून शालेय शिक्षण विभाग विभागाकडून प्राप्त होणारे कौशल्य चाचणी शुल्क वजा जाता उर्वरित कौशल्य चाचणी शुल्क प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता अभियानातून अदा करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५३०१७१५४००३०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Wasudev Gawande

Digitally signed by Gajanan Wasudev Gawande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development And Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=598b4111a7392ee0c9038cf4c426c1f9ef65d75e9ac67ec77c38a9c5895cc932, serialNumber=92cce2bddffe9d1b98d5b31109f5f81e224273580cfca2f478d921078212cf69, cn=Gajanan Wasudev Gawande
Date: 2019.05.30 17:22:01 +05'30'

**( गजानन वा. गावंडे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२. सर्व संबंधित मा.मंत्री,यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व संबंधित मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.विरोधी पक्षनेता ,विधानपरिषद /विधानसभा यांचे खाजगी सचिव,विधानभवन ,मुंबई,
५. सर्व विधानमंडळ सदस्य , महाराष्ट्र राज्य ,
६. मा.मुख्य सचिव, मंत्रालय , मुंबई
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई,
१०. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई,
११. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद, मुंबई,
१२. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१३. महालेखापाल ( लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१४. अधिदान व लेखा अधिकारी ,मुंबई,
१५. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी ,मुंबई,
१६. सर्व विभागीय आयुक्त,
१७. सर्व जिल्हाधिकारी ,
१८. आयुक्त , सर्व महानगर पालिका,
१९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२०. मुख्याधिकारी, सर्व नगर परिषद/नगर पंचायती,
२१. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२२. उपसंचालक, विभागीय मुख्यालय कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर,
२३. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर,
२४. सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,मंत्रालय, मुंबई
२५. निवड नस्ती.